## उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीस राज्य पुरस्कार, शासन निर्णय

| अनुक्रमांक | शासन निर्णय |
|---|---|
| १ | समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,<br>शासन निर्णय क्र. मवापु. १०९४/प्र.क्र. ३५०/ सां.का. २,<br>दिनांक ३० जून १९९५. |
| २ | समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,<br>शासन निर्णय क्र. मवापु. १०९४/प्र.क्र. ३५०/ सां.का. २,<br>दिनांक १ जुलै १९९५. |
| ३ | समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,<br>शासन निर्णय क्र. मवापु. १०९६/२६०६/प्र.क्र. ३९५/ सां.का. २,<br>दिनांक ३ सप्टेंबर १९९७. |
| ४ | समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,<br>शासन निर्णय क्र. मवापु. १०९४/प्र.क्र. ३५०/ सां.का. २,<br>दिनांक २३ जून १९९८. |
| ५ | समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,<br>शासन निर्णय क्र. मवापु. १०९४/प्र.क्र. ३५०/ सां.का. २,<br>दिनांक ६ फेब्रुवारी १९९९. |
| ६ | समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,<br>शासन निर्णय क्र. मवापु. १०९९/प्र.क्र. २४८/ सां.का. २,<br>दिनांक २८ जुलै १९९९. |
| ७ | समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,<br>शासन निर्णय क्र. मवापु. २०००/प्र.क्र. १६/ सां.का. २,<br>दिनांक ७ ऑगस्ट २०००. |
| ८ | समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,<br>शासन निर्णय क्र. मवापु. २०००/प्र.क्र. ३९६/ सां.का. २,<br>दिनांक ८ फेब्रुवारी २००१. |
| ९ | समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,<br>शासन निर्णय क्र. मवापु. विकाक. २००१/प्र.क्र. ५४/ सां.का. २,<br>दिनांक ९ एप्रिल २००२. |
| १० | शासन पत्र, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,<br>क्र. मवापु. २००८/प्र.क्र. १४५/ सां.का. ३,<br>दिनांक १९ जून २००८. |
| ११ | पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,<br>शासन निर्णय क्र. मवापु. २००८/प्र.क्र. १३०/ सां.का. ३,<br>दिनांक १६ जानेवारी २००९<br>उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मितीस राज्य पुरस्काराच्या रकमेत वाढ करण्याबाबत |



**मराठी भाषेतील उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीस राज्य पुरस्कार योजना. नियमावलीत सुधारणा**

महाराष्ट्र शासन
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
शासन निर्णय मवापु-२००६/प्र.क्र. २२६/सां.का.३,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक २० सप्टेंबर २००६.

**वाचा**.— (१) समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्र. मवापु. १०९४/प्र.क्र. ३५०/ सां.का. २,दिनांक १ जुलै १९९५.
(२) संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांचे
पत्र क्रमांक सांकास-२४९०, दिनांक १२ जुलै २००६.

**प्रस्तावना**.— मराठी भाषेतील उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीस राज्य पुरस्कार देण्याची योजना वरील अनुक्रमांक १ च्या दिनांक १ जुलै १९९५ च्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येत आहे. या योजनेच्या नियमावलीतील नियम क्रमांक ८ नुसार "ज्या पुस्तकांची प्रवेशिका या स्पर्धेसाठी पाठविली असेल ती पुस्तकेच फक्त स्पर्धेसाठी पात्र ठरतील." सदर नियमात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. विचारांती शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :—

**शासन निर्णय.**— संदर्भाधीन शासन निर्णयातील नियम क्रमांक ८ खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहे :—

"दिनांक १ एप्रिल ते ३१ मार्च या काळात प्रकाशित झालेले तथापि, कोणत्याही कारणास्तव स्पर्धेत लेखकांकडून अथवा प्रकाशकांकडून दाखल न झालेले पुस्तक हे अन्य व्यक्ती अथवा संस्था यांनी पुरस्कारासाठी पाठविल्यास ते स्वीकाराले जाईल. परीक्षण समितीचे अध्यक्ष / सदस्य यांना स्वत:हून एखाद्या लेखकाचे / प्रकाशकाचे पुस्तक दाखल करण्यास परवानगी असेल. मात्र, याबाबत मूळ लेखकाची / प्रकाशकाची ना हरकत घेऊनच सदर पुस्तके परीक्षण समितीपुढे ठेवण्यात यावीत."

२. उपरोक्त सुधारित नियम क्रमांक ८ नुसार ज्या लेखकांची पुस्तके परीक्षण समितीपुढे ठेवण्यात येतील अशा पुस्तकांना या योजनेच्या नियमावलीतील अन्य सर्व नियम लागू असतील. पुस्तक पुरस्कारासाठी योग्य ठरल्यास, पुरस्कार जाहीर करण्यापूर्वी संबंधित लेखक / प्रकाशक यांना पूर्व कल्पना दिली जाईल. अशी पुस्तके या योजनेसाठी स्वीकारणे, त्याचा वाङ्मय प्रकार निश्चित करणे याबाबत अंतिम निर्णय हा परीक्षण समितीचा असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**मीना जोशी,**

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सदस्य, उत्कृष्ट वाङ्मय परीक्षण समिती (संचालकांमार्फत).
महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
निवड नस्ती का. सांका-३.

**मराठी भाषेतील उत्कृष्ट वाङ्‌मय निर्मितीस**
**राज्य पुरस्कार देण्याची योजना**

१ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांना निवडीअंती राज्य शासन पुरस्कार देते. या योजने अंतर्गत पुढील साहित्य प्रकारामध्ये पुरस्कार देण्यात येतात.—

(एक) प्रौढ वाङ्‌मय—३० साहित्य प्रकार,

(अ) प्रथम प्रकाशन—९ साहित्य प्रकार,

(आ) विशेष पुरस्कार—१५ साहित्य प्रकार,

(इ) महाराष्ट्राबाहेर प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांना—२ पुरस्कार.

(दोन) बाल वाङ्‌मय—६ साहित्य प्रकार.

**नियम**

(१) या स्पर्धेसाठी पाठवावयाची पुस्तके दिनांक १ एप्रिल ते ३१ मार्च (दोन्ही दिवस धरून) या कालावधीत प्रकाशित झालेली व प्रत्यक्षात बाजारात उपलब्ध असलेली असावी.

(२) या स्पर्धेसाठी प्रवेशिका स्वीकारण्याची शेवटची तारीख संचालक, सांस्कृतिक कार्य जाहीर करतील.

(३) ही स्पर्धा महाराष्ट्रातील आणि महाराष्ट्राबाहेरील सर्व लेखकांसाठी आणि प्रकाशकांसाठी खुली आहे.

(४) या स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी कोणतेही स्पर्धा शुल्क नाही. स्पर्धेच्या प्रवेशिकांसाठी आवश्यक प्रपत्र संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयात उपलब्ध होईल. तसेच नजिकच्या जिल्हाधिकारी कार्यालयातही उपलब्ध होतील.

(५) या योजनेखालील स्पर्धेमध्ये ज्या लेखकांना एका विशिष्ट लेखन प्रकारामध्ये तीन वेळा पारितोषिके मिळाली असतील अशा लेखकांना त्याच लेखन प्रकारांमध्ये या स्पर्धेसाठी पुस्तक पाठविता येणार नाही. मात्र प्रौढ वाङ्‌मय विभागातील तसेच बाल वाङ्‌मय विभागातील सर्वोत्कृष्ट पुस्तकांनाच ही अट लागू आहे. प्रथम प्रकाशन विभागातील पुरस्कारांची व विशेष वाङ्‌मय पुरस्कारांची त्यात गणना केली जाणार नाही.

(६) पुस्तकांची फक्त **प्रथम आवृत्तीच** स्पर्धेकरिता पात्र ठरेल.

(७) पुस्तकात प्रकाशन **दिनांक, वर्ष छापलेले असणे आवश्यक आहे**. तारखेचा व वर्षाचा **रबरी शिक्का अथवा डकवलेली पट्टी ग्राह्य धरण्यात येणार नाही**.

(८) दिनांक १ एप्रिल ते ३१ मार्च या काळात प्रकाशित झालेले तथापि कोणत्याही कारणास्तव स्पर्धेत लेखकांकडून अथवा प्रकाशकांकडून दाखल न झालेले पुस्तक हे अन्य व्यक्ती अथवा संस्था यांनी पुरस्कारासाठी पाठविल्यास ते स्वीकारले जाईल. परीक्षण समितीचे अध्यक्ष / सदस्य यांना स्वतःहून एखाद्या लेखकाचे / प्रकाशकाचे पुस्तक दाखल



करण्यास परवानगी असेल. मात्र याबाबत **मूळ लेखकाचे / प्रकाशकाचे ना हरकत घेऊनच सदर पुस्तके परीक्षण समितीपुढे ठेवण्यात येतील.** ज्या लेखकांची पुस्तके परीक्षण समितीपुढे ठेवण्यात येतील अशा पुस्तकांना या योजनेच्या नियमावलीतील अन्य सर्व नियम लागू असतील. पुस्तक पुरस्कारासाठी योग्य ठरल्यास, पुरस्कार जाहीर करण्यापूर्वी संबंधित लेखक / प्रकाशक यांना पूर्व कल्पना दिली जाईल. अशी पुस्तके योजनेसाठी स्वीकारणे, त्याचा वाङ्‌मय प्रकार निश्चित करणे याबाबत अंतिम निर्णय हा परीक्षण समितीचा असेल.

(९) या स्पर्धेसाठी **हस्तलिखित किंवा टंकलिखित** पुस्तकांचा विचार केला जाणार नाही.

(१०) ज्या पुस्तकामध्ये पूर्वी राज्य किंवा साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळालेल्या पुस्तकांमधील काही भागाचा समावेश केला असल्यास, अशी पुस्तके स्पर्धेसाठी पात्र ठरणार नाहीत.

(११) साहित्य अकादमीचे पुरस्कार मिळालेल्या पुस्तकांचा या स्पर्धेसाठी विचार केला जाणार नाही.

(१२) स्पर्धेसाठी दाखल करावयाच्या पुस्तकाचे लेखक एकापेक्षा अधिक असतील आणि या सर्व सहलेखकांपैकी एखादा लेखक जरी स्पर्धेच्या इतर नियमांप्रमाणे त्या लेखन प्रकारात भाग घेण्यास अपात्र ठरत असेल तर ते पुस्तक त्या लेखन प्रकारात भाग घेण्यास **अपात्र समजण्यात** येईल.

(१३) दिवंगत लेखकांची प्रवेशिका या स्पर्धेसाठी अपात्र समजली जाईल. तथापि, एखाद्या दिवंगत लेखकाची ती पहिलीच साहित्यकृती असेल आणि प्रकाशकाचे तसे प्रतिज्ञापत्र असेल आणि ती साहित्यकृती त्या लेखकाच्या निधनाच्या निकटच्या काळात उत्कृष्ट वाङ् मय निर्मिती स्पर्धेसाठी सादर झाली असल्यास त्या पुस्तकाची प्रवेशिका पात्र ठरविण्यात येईल.

त्याचप्रमाणे आत्मचरित्र या लेखन प्रकारांच्या बाबतीत पुस्तकातील संबंधित लिखाण लेखकाचे स्वतःचे आणि स्वतंत्र आहे अशी माहिती दिवंगत लेखकाच्या निकटच्या नातेवाईकांनी लेखी दिल्यास अशी प्रवेशिका पात्र समजण्यात येईल.

(१४) प्रवेशिकेतील वाङ्‌मय प्रकाराचा उल्लेख **अचूकपणे नमूद करणे** आवश्यक आहे.

(१५) एकच पुस्तक **अनेक वाङ्‌मय प्रकारात सादर करता येणार नाही.** तसे निदर्शनास आल्यास त्या पुस्तकांचा स्पर्धेसाठी विचार करता येणार नाही.

(१६) अपूर्ण प्रवेशिका विचारात घेतल्या जाणार नाहीत.

(१७) परीक्षण मंडळावर अथवा मंडळ सदस्यांवर दबाव येतो आहे असे सिद्ध झाल्यास ज्या प्रवेशिकांबाबत हा दबाव येत असेल ती प्रवेशिका **विचारात घेतली जाणार नाही.**

(१८) ज्या लेखकांना, प्रकाशकांना शिफारसकर्त्यांना या योजनेत भाग घ्यावयाचा असेल त्यांनी प्रत्येक प्रवेशिका प्रपत्राबरोबर, आपल्या पुस्तकांच्या **दोन प्रती** पुढील नमुन्यातील अर्जासह संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, जुने सचिवालय, महात्मा गांधी मार्ग, मुंबई ४०० ०३२ यांजकडे पाठवाव्यात, स्पर्धेसाठी दिलेल्या प्रती स्पर्धकास नंतर परत करण्यात **येणार नाहीत.**

टीप.— (१) कोणत्याही विभागातील लेखन प्रकारांमध्ये अपेक्षित दर्जाचे एकही पुस्तक न आढळल्यास एकही पारितोषिक दिले जाणार नाही. याबाबत अंतिम निर्णय शासनाचा राहील.

(२) प्रथम प्रकाशन उप विभागातील एखाद्या लेखन प्रकारातील सर्वोत्कृष्ट पुस्तक मुख्य विभागातील सर्वोत्कृष्ट दोन पुस्तकांपैकी एक ठरल्यास त्या पुस्तकास प्रथम प्रकाशनाचे पारितोषिक न देता फक्त उत्कृष्ट पुस्तकाचे पारितोषिक देण्यात येईल. या लेखन प्रकारातील प्रथम प्रकाशनाचे पारितोषिक अन्य उत्कृष्ट पुस्तकास योग्य वाटल्यास देण्यात येईल.

(३) एखाद्या लेखन प्रकारास स्पर्धेसाठी आलेल्या प्रवेशिकांतून पारितोषिकांसाठी फक्त एकच अपेक्षित दर्जाचे पुस्तक आढळल्यास त्या लेखन प्रकारास एकच पारितोषिक दिले जाईल. याबाबत अंतिम निर्णय शासनाचा राहील.



**पुरस्कारासाठी विभाग आणि साहित्य प्रकार**

**(एक) प्रौढ वाङ्मय**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | **काव्य** | | | |
| | कवी केशवसूत पुरस्कार | .. | .. | रु. २०,००० |
| | बालकवी पुरस्कार | .. | .. | रु. २०,००० |
| (२) | **नाटक** | | | |
| | राम गणेश गडकरी पुरस्कार | .. | .. | रु. २०,००० |
| | आण्णासाहेब किर्लोस्कर पुरस्कार | .. | .. | रु. २०,००० |
| (३) | **कादंबरी** | | | |
| | हरी नारायण आपटे पुरस्कार | .. | .. | रु. २०,००० |
| | वि. स. खांडेकर पुरस्कार | .. | .. | रु. २०,००० |
| (४) | **लघुकथा** | | | |
| | दिवाकर कृष्ण पुरस्कार | .. | .. | रु. २०,००० |
| | पु. भा. भावे पुरस्कार | .. | .. | रु. २०,००० |
| (५) | **ललितगद्य** | | | |
| | अनंत काणेकर पुरस्कार | .. | .. | रु. २०,००० |
| | वि. द. घाटे पुरस्कार | .. | .. | रु. २०,००० |
| (६) | **एकांकिका** | | | |
| | मामा वरेरकर पुरस्कार | .. | .. | रु. २०,००० |
| (७) | **विनोद** | | | |
| | श्रीपाद कृष्ण कोल्हटकर व आचार्य अत्रे पुरस्कार | .. | .. | रु. २०,००० |
| (८) | **संकीर्ण** | | | |
| | भाई माधवराव बागल पुरस्कार | .. | .. | रु. २०,००० |

(९) **ललितविज्ञान**

र. धों. कर्वे पुरस्कार .. .. रु. २०,०००

(१०) **चरित्र**

लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार .. .. रु. २०,०००

(११) **आत्मचरित्र**

न. चिं. केळकर पुरस्कार .. .. रु. २०,०००

(१२) **समीक्षा आणि सौंदर्यशास्त्र**

श्री. के. क्षीरसागर पुरस्कार .. .. रु. २०,०००

के. नरहर कुरूंदकर पुरस्कार .. .. रु. २०,०००

(१३) **इतिहास**

महात्मा ज्योतीराव फुले पुरस्कार .. .. रु. २०,०००

(१४) **अर्थशास्त्र**

सी. डी. देशमुख पुरस्कार .. .. रु. २०,०००

(१५) **राज्यशास्त्र व समाजशास्त्र**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार .. .. रु. २०,०००

(१६) **तत्त्वज्ञान, व मानसशास्त्र**

ना. गो. नांदापूरकर पुरस्कार .. .. रु. २०,०००

(१७) **शिक्षण शास्त्र**

कर्मवीर भाऊराव पाटील पुरस्कार .. .. रु. २०,०००

(१८) **भाषाशास्त्र व व्याकरण**

ना. गो. कालेलकर पुरस्कार .. .. रु. २०,०००

दादोबा पांडुरंग पुरस्कार .. .. रु. २०,०००

(१९) **भौतिकशास्त्र व तंत्रविज्ञान**

डॉ. एन्. आर. तावडे पुरस्कार .. .. रु. २०,०००



(२०) **दलित, पददलितावरील आदर्श साहित्य**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार .. .. रु. १०,०००

(२१) **अनुवादित**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी पुरस्कार .. .. रु. २०,०००

(२२) **संपादित**

डॉ. वि. भि. कोलते पुरस्कार .. .. रु. २०,०००

(२३) **आधारित**

संत गाडगे महाराज पुरस्कार .. .. रु. २०,०००

(२४) **संशोधन**

ग. त्र्यं. माडखोलकर पुरस्कार .. .. रु. २०,०००

(२५) **ललितकला आस्वादपर लेखन**

पु. ल. देशपांडे पुरस्कार .. .. रु. २०,०००

(२६) **शेती व शेतीपूरक लेखन**

वसंतराव नाईक पुरस्कार .. .. रु. २०,०००

(२७) **शेतीपूरक व्यवसाय लेखन**

डॉ. पंजाबराव देशमुख पुरस्कार .. .. रु. २०,०००

(२८) **क्रीडा वाङ्मय**

राजर्षी शाहू महाराज पुरस्कार .. .. रु. २०,०००

(२९) **संगणक व इंटरनेट**

रँग्लर परांजपे पुरस्कार .. .. रु. २०,०००

(३०) **पर्यावरण**

डॉ. सलीम अली पुरस्कार .. .. २०,०००

## (अ) प्रथम प्रकाशन

खालील लेखन प्रकारातील लेखकाचे पहिले प्रसिद्ध झालेले पुस्तक म्हणजे "प्रथम प्रकाशन" समजण्यात येईल. लेखकांनी कृपया प्रवेशिकेत तसा स्पष्ट उल्लेख करावा :—

(१) **काव्य**

बहिणाबाई चौधरी पुरस्कार . . . . रु. १०,०००

(२) **नाटक**

लोटू पाटील पुरस्कार . . . . रु. १०,०००

(३) **कांदबरी**

श्री. ना. पेंडसे पुरस्कार . . . . रु. १०,०००

(४) **लघुकथा**

ग. ल. ठोकळ पुरस्कार . . . . रु. १०,०००

(५) ललितगद्य

ताराबाई शिंदे पुरस्कार . . . . रु. १०,०००

(६) **एकांकिका**

दादासाहेब धनवटे पुरस्कार . . . . रु. १०,०००

(७) **समीक्षा आणि सौंदर्यशास्त्र**

कुसुमावती देशपांडे पुरस्कार . . . . रु. १०,०००

(८) **अनुवादित**

वा. रा. कांत पुरस्कार . . . . रु. १०,०००

(९) **संपादित**

रा. ना. चव्हाण पुरस्कार . . . . रु. १०,०००



## (आ) विशेष पुरस्कार

(१) **काव्य**

इंदिरा संत पुरस्कार . . . . रु. ५,०००

(२) **नाटक**

वि. वा. शिरवाडकर पुरस्कार . . . . रु. ५,०००

(३) **कादंबरी**

उद्धव ज. शेळके पुरस्कार . . . . रु. ५,०००

(४) **लघुकथा**

बी. रघुनाथ पुरस्कार . . . . रु. ५,०००

(५) **ललितगद्य**

मधुकर केचे पुरस्कार . . . . रु. ५,०००

(६) **एकांकिका**

जयवंत दळवी पुरस्कार . . . . रु. ५,०००

(७) **विनोद**

दत्तू बांदेकर पुरस्कार . . . . रु. ५,०००

(८) **संकीर्ण**

कृष्णराव भालेकर पुरस्कार . . . . रु. ५,०००

(९) **ललितविज्ञान**

संत तुकडोजी महाराज पुरस्कार . . . . रु. ५,०००

(१०) **चरित्र**

धनंजय कीर पुरस्कार . . . . रु. ५,०००

(११) **आत्मचरित्र**

यशवंतराव चव्हाण पुरस्कार . . . . रु. ५,०००

(१२) **समीक्षा आणि सौंदर्यशास्त्र**

वा. ल. कुलकर्णी पुरस्कार .. .. रु. ५,०००

(१३) **इतिहास**

क्रांतिसिंह नाना पाटील पुरस्कार .. .. रु. ५,०००

(१४) **अर्थशास्त्र**

डॉ. धनंजराव गाडगीळ पुरस्कार .. .. रु. ५,०००

(१५) **राज्यशास्त्र व समाजशास्त्र**

बॅरीस्टर नाथ पै पुरस्कार .. .. रु. ५,०००

**(इ) महाराष्ट्राबाहेर प्रसिद्ध झालेली पुस्तके**

महाराष्ट्राबाहेरून प्रसिद्ध झालेले कोणत्याही वाङ्मय प्रकारातील पुस्तके यांचा स्वतंत्र गट बृहन्महाराष्ट्र पुरस्कारासाठी करण्यात येईल.

(१) **बृहन्महाराष्ट्र पुरस्कार**

विठ्ठल रामजी शिंदे पुरस्कार .. .. रु. २०,०००

सयाजी महाराज गायकवाड पुरस्कार .. .. रु. २०,०००

**(दोन) बाल वाङ्मय पुरस्कार**

(१) **कविता**

भा. रा. तांबे पुरस्कार .. .. रु. २०,०००

वा. गो. मायदेव पुरस्कार .. .. रु. २०,०००

(२) **चरित्रे**

वि. का. ओक पुरस्कार .. .. रु. २०,०००

ग. ह. पाटील पुरस्कार .. .. रु. २०,०००

(३) **सर्वसामान्य ज्ञान (छंद व शास्त्रे)**

यदुनाथ थत्ते पुरस्कार .. .. रु. २०,०००

राजा केळकर पुरस्कार .. .. रु. २०,०००



(४) **नाटक व एकांकिका**

राम गणेश गडकरी पुरस्कार .. .. रु. २०,०००

शाहीर अमरशेख पुरस्कार .. .. रु. २०,०००

व. गो. आपटे पुरस्कार .. .. रु, २०,०००

(५) **बाल कादंबरी/छोट्या गोष्टी/परिकथा/लोककथा**

गोपिनाथ तळवळकर पुरस्कार .. .. रु. २०,०००

सानेगुरूजी पुरस्कार .. .. रु. २०,०००

कवी दत्त पुरस्कार .. .. रु. २०,०००

ना. धो. ताम्हणकर पुरस्कार .. .. रु. २०,०००

(६) **ललित गद्य/बालसाहित्य समीक्षा आणि संकीर्ण**

रेव्हरंड ना. वा. टिळक पुरस्कार .. .. रु. २०,०००

दि. के. बेडेकर पुरस्कार .. .. रु. २०,०००

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

## मराठी भाषेतील उत्कृष्ट वाङ्‌मय निर्मितीस राज्य पुरस्कार देण्याची योजना

# नियम व माहिती

(शा.म.मु.) एन १४२ (अ) (२०००—४-२००९)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

## मराठी भाषेतील उत्कृष्ट वाङ्‌मय निर्मितीस राज्य पुरस्कार देण्याची योजना

# नियम व माहिती

**सांस्कृतिक कार्य संचालनालय**

जुने सचिवालय, विस्तार भवन, पहिला मजला

महात्मा गांधी मार्ग, मुंबई ४०० ०३२

दूरध्वनी क्र. २२८४ २६ ३४ / ७०, २२०४ ३५ ५० / ७१

## मराठी भाषेतील उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीस राज्य पुरस्कार
## प्रवेशिका

(१) पुस्तकाचे नाव

(२) विभाग (अ) प्रौढ वाङ्मय (३० प्रकार)

(१) प्रथम प्रकाशन

(२) विशेष पुरस्कार

(३) महाराष्ट्राबाहेर प्रसिद्ध झालेले पुस्तक

(ब) बाल वाङ्मय (६ प्रकार) .. ..

(३) वाङ्मय प्रकार (पुस्तिकेत दर्शविल्याप्रमाणे) .. ..

(४) लेखकाचे नाव व संपूर्ण पत्ता .. ..

(अ) (दूरध्वनी क्रमांक/मोबाईल क्रमांक) .. ..

(आ) लेखकाचे ज्या नावे बँकेत खाते आहे ते नाव (इंग्रजीमध्ये कॅपिटल अक्षरात) ..

(बँकेचे नाव किंवा खाते क्रमांक नाही.)

(५) प्रकाशकाचे नाव, पत्ता व दूरध्वनी क्रमांक/मोबाईल क्रमांक .. ..

(६) प्रकाशन दिनांक .. ..

(७) लेखन संपूर्ण स्वतंत्र आहे का ? .. ..

या पुस्तकची ही प्रथम आवृत्ती आहे काय ? .. ..

(८) ज्या लेखन प्रकारात या पुस्तकाचे वर्गीकरण होते त्या लेखन प्रकारातील पुस्तकांना राज्य शासनाच्या या योजनेअंतर्गत लेखकाला पूर्वी पुरस्कार मिळाला आहे काय ? असल्यास, किती वेळा ?

(९) या पुस्तकाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे काय ?

(१०) या पुस्तकामध्ये यापूर्वी राज्य किंवा साहित्य अकादमी पुरस्कार मिळालेल्या पुस्तकातील भाग समाविष्ट आहे काय ?

(११) सोबत खालील बाबी जोडल्या आहेत काय ?

(अ) पुस्तकांच्या दोन प्रती.

(ब) लेखकाच्या साहित्यक्षेत्रातील कार्याचा व अन्य माहितीचा तपशील २ प्रतींत (फक्त ३० ओळी) व त्यावर चिटकवलेले दोन फोटो आवश्यक आहेत.

(क) लेखकाचे वा प्रकाशकाचे सोबतच्या विहित नमुन्यातील प्रमाणपत्र (प्रवेशिका पाठविणारे लेखक अथवा प्रकाशक नसल्यास त्यांनी हे प्रमाणपत्र पाठविण्याची आवश्यकता नाही.)

(ड) नियम क्र. १३ लागू होत असल्यास प्रकाशकाचे प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे.

**टीप.—** (१) वरील अनुक्रमांक (३) **येथे दर्शविलेल्या वाङ्मय प्रकाराचे वर्गीकरण चुकीचे नमूद केल्यामुळे प्रवेशिका रद्द होऊ शकते.**

(२) वाङ्मय प्रकार हा अर्जदाराने स्वहस्ताक्षरात लिहिणे आवश्यक आहे.

वरील दिलेली माहिती आणि तपशील सत्य आहे.

(सही)

प्रवेशिक पाठविणाऱ्याचे नाव, पत्ता आणि दूरध्वनी क्रमांक ........................... प्रकाशक/लेखक/शिफारसकर्ता

(शा.म.मु.) एन १४२ (ब) (२०००—४-२००९)

**मराठी भाषेतील उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीस राज्य पुरस्कार**
**लेखक अथवा प्रकाशक यांचे**

## प्रमाणपत्र

(१) प्रमाणित करण्यात येते की, ........................................................... या पुस्तक प्रकाशनाचा अचूक दिनांक .................................... हा दिनांक परीक्षक, पुस्तके व परीक्षण कार्यालय यांजकडे नोंदविल्याप्रमाणे आहे.

(२) ............................................. पुस्तकातील लिखाण स्वतःचे आणि स्वतंत्र आहे.

(३) मराठी भाषेतील उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीस राज्य पुरस्कार या योजनेखाली लेखकाला .................................... या लेखन प्रकारातील तीन किंवा अधिक वेळा पारितोषिके मिळालेली नाहीत.

(सही)
लेखक/प्रकाशक

नाव

रबरी शिक्का.

(शा.म.मु.) एन १४२ (क) (२०००—४-२००९)